# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८

## वैद्यकीय विभाग, (धन्वंतरी कक्ष)

धन्वंतरी समिती सभा

दि. १२/२/२०१६

## सभावृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी आणि कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे कुटुंबीय तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी, पती/ पत्नी यांचे वैद्यकीय उपचाराकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार धन्वंतरी स्वास्थ्य योजना दिनांक १ सप्टेंबर २०१५ पासून सुरु झालेली आहे.

धन्वंतरी स्वास्थ योजना धोरण २०१३ मधील अ.क्र. १९ मध्ये समितीची बैठक महिन्यातुन कमीत कमी एकदा घेण्यात यावी अशी तरतुद आहे. तसेच या धोरणामध्ये अध्यक्ष, उपाध्याक्षंसह इतर सदस्यांची समिती गठीत केलेली आहे.

दि. १/९/२०१५ पासुन दि. १२/२/२०१६ पर्यंत धन्वंतरी योजनेचे कामकाज करताना निदर्शनास आलेल्या अडचणी, प्राप्त तक्रारी, व गुंतागुंतीची प्रकरणे यावर निर्णय घेण्यासाठी दि. १२/२/२०१६ रोजीचे धन्वंतरी स्वास्थ समितीच्या मिटींगमध्ये प्रस्ताव/ विषयपत्रिका सादर करण्यात आलेली आहे.

सदर मिटींगसाठी पुढीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा. श्री.राजीव जाधव | आयुक्त तथा अध्यक्ष |
| २ | मा. श्री.बबनराव झिंजुर्डे | अध्यक्ष, पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ तथा उपाध्यक्ष |
| ३ | मा. डॉ.मनोज देशमुख | वैद्यकीय अधिक्षक तसेच आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे प्रतिनिधी |
| ४ | मा. श्रीम.पद्मश्री तळदेकर | मख्य लेखा परिक्षक तथा सदस्य |
| ५ | मा. श्री.सतिश पवार | कायदा सल्लागार तथा सदस्य |
| ६ | मा. डॉ.महेशकुमार डोईफोडे | सहाय्यक आयुक्त (प्रशासन) तथा सदस्य |
| ७ | मा. श्री.रमेशकुमार जोशी | लेखाधिकारी, मुख्यलेखापाल यांचे प्रतिनिधी |
| ८ | मा. श्री.चंद्रकांत इंदलकर | कामगार कल्याण अधिकारी तथा सचिव |
| ९ | मा. श्री.मधुकर रणपिसे | पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ तथा सह खजिनदार |
| १० | मा.श्री.मनोज माछरे | पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ तथा सह खजिनदार |

| अ.क्र. | मुद्दा | समितीने घेतलेला निर्णय |
|---|---|---|
| १ | देवधर हॉस्पिटल, पिंपरी यांचे धन्वंतरी योजनेमधून बाहेर पडणेबाबत पत्र | देवधर हॉस्पीटल, पिंपरी यांना धन्वंतरी पॅनल मधुन बाहेर पडण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| २ | महापालिकेचे कर्मचारी/त्यांचे नातेवाईक रुग्णालयामध्ये उपचारासाठी गेल्यानंतर काही कर्मचारी तेथील स्टाफला अँडमिशन/उपचारावरुन शिविगाळ करतात, गैरवर्तन करतात, अँडमिशनची गरज नसताना अँडमिट करा म्हणून आग्रह धरतात, नकार दिल्यास वाद घालून शिविगाळ करतात. (अमृत हॉस्पिटलचे पत्र आहे.) | धन्वंतरी पॅनलच्या रुग्णालयांमध्ये मनपा अधिकारी / कर्मचारी यांनी विनाकारण ऍडमिट करुन घेण्यासाठी वाद घातल्यास अथवा इतर कोणताही कारणांसाठी गोंधळ करणे, शिवीगाळ करणे, हॉस्पीटलमधील डॉक्टर, स्टाफ सोबत भांडण करणे अशा स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे आढळल्यास व तशी तक्रार मनपास प्राप्त झाल्यास अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द त्या-त्या विभागाचे विभागप्रमुखांनी त्यांना प्रदान केलेल्या शास्तीविषयक अधिकारामध्ये कारवाई करावी. |
| ३ | १. श्री.सुभाष माछरे, सहाय्यक आयुक्त यांचा पुढील उपचारासाठी मुंबई येथील फोर्टीस हॉस्पिटल मुलुंड येथे उपचार घेणेस परवानगी देणेबाबत.<br>२. श्री.सुभाष माछरे, क्षेत्रिय अधिकारी, यांनी स्वतःचे वैद्यकीय उपचाराचेरु.१,२७,९१५/-चे बिल सादर केले आहे. श्री.माछरे यांनी आदित्य बिर्ला रुग्णालय येथे उपचार घेतले असून रुग्णालयाचे सल्यानुसार मुंबई येथिल फोर्टीस हॉस्पिटल येथे उपचार घेतले आहेत. | श्री. सुभाष माछरे, क्षेत्रीय अधिकारी यांना धन्वंतरी पॅनलवरील बिर्ला रुग्णालयाने पुढील उपचारासाठी फोर्टीस रुग्णालय, मुलुंड, मुंबई येथे रेफर केले असल्याने फोर्टीस रुग्णालय, मुंबई येथे येणाऱ्या खर्चासाठी धन्वंतरी योजनेचे नियमानुसार व मंजुर दराने व सदरचा खर्च ते स्वतः करीत असल्याने मा. स्थायी समितीची मान्यता घेवुन सदर खर्च प्रतिपुर्ती करुन देण्यात यावा. व अशी इतर प्रकरणे असल्यास त्याबाबतही याच निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. व तशी धोरणामध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४ | श्रीम.सरोज दिपक नायडू (श्री.दिपक सुभाष नायडु, मजुर स्थापत्य विभाग यांची पत्नी) यांचा अर्ज... श्री.दिपक नायडू यांचा दि.14/09/2014 रोजी अपघात झाला असून ते कोमामध्ये होते. त्यांचे वैद्यकीय उपचाराचा (फिजीओथेरेपी) खर्च धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमधून मिळणे बाबत अर्ज सादर केला आहे.याबाबत विचार करणे. | श्री. दिपक नायडु यांनी यापुढे मनपाचे वायसीएम रुग्णालयामध्ये फिजीओथेरेपीची व्यवस्था असल्याने वायसीएमएच येथे फिजीओथेरेपी करावी. याकरीता धन्वंतरी योजनेतुन प्रतिपुर्ती देणेत येणार नाही. |
| ५ | श्री.राजेंद्र भगवंत चव्हाण, रखवालदार यांचा मुलगा कु.सागर हा थॅलेसेमियाने आजारी असून बिछान्यावर आहे. मुलाचे वय २५ पेक्षा जास्त आहे. त्यास धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमधून उपचार मिळणेबाबत कर्मचा-याचा अर्ज (Chronic disorder under inability to earn) याबाबत विचार करणे. | मनपा अधिकारी / कर्मचारी यांचा पाल्य अपंग, मतिमंद असल्यास व तो पुर्णपणे सभासदावर अवलंबुन आहे व तो स्वत:ची उपजिविका करण्यास पुर्णपणे असमर्थ असल्यास अशावेळी सदर अपंग, मतिमंद पाल्यपुर्णपणे सभासदावर अवलंबुन असल्याबाबतवायसीएम रुग्णालयामार्फतससुन रुग्णालयाचा दाखला घेवुन, तसेच अशा वेळी पाल्याचे वय २५ वर्षापेक्षा जास्त असले तरीदेखील वयाची अट शिथिल करुन अशा पाल्याचा धन्वंतरी योजनेमधुन उपचाराचा खर्च करण्यास मान्यता देणेत येत आहे. याबाबत धोरणामध्ये योग्य तो बदल / सुधारणा करण्यात यावी. |
| ६ | श्री.अरुण चौरे, रखवालदार यांचा धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमध्ये सामावेश करणेबाबतचा अर्ज. श्री.चौरे हे विनापरवाना गैरहजर होते, ते दि.१८/१०/१५ पासून कामावर येत असून धन्वंतरी स्वास्थ्य योजना सुरु झाल्यापासून त्यांचे वर्गणी महापालिकेच्या हिश्यासह स्विकारणे. व यापुढे अशाप्रकारे कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे. | श्री. अरुण चौरे, रखवालदार यांचेकडुन माहे मे २०१५ पासुनची वर्गणीमहापालिका हिश्श्यासह रोख स्वरुपात मनपा कोषागारात जमा करुन घेतलेनंतर नियमाप्रमाणे त्यांना सभासद करुन घेणेची कार्यवाही करावी. सदर निर्णयाचा धोरणामध्ये समावेश करण्यास व यापुढे अशी प्रकरणे प्राप्त झाल्यास निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. |
| ७ | कर्मचा-यांचे २५ वर्षावरील अपंग मुलांचे उपचाराबाबत कॅटेगरी ठरविणे. उदा.कायम स्वरुपी अपंग पाल्य (अंथरुणाला खिळलेले व पुर्णपणे दुस-यावर अवलंबुन आहेत (only physical disability + inability to earn) तसेच आवश्यकतेनुसार वायसीएमएच कडे तपासणी करणेस मान्यता मिळणेबाबत. | मुद्दा क्र. ५ प्रमाणे |
| ८ | श्री.भारत विठ्ठल चव्हाण, पदनाम मजुर, जलशुध्दीकरण केंद्र विद्युत, हे अपघात झाल्यामुळे दिनांक ७ सप्टेंबर २०१५ पासून आदित्य बिर्ला हॉस्पिटल, चिंचवड येथे उपचारासाठी अॅडमिट आहेत. त्यांचा उपचाराचा खर्च रु.२० लाखापेक्षा जास्त झाला आहे. धन्वंतरी स्वास्थ्य योजना २०१३ मधील कलम १७ नुसार कर्मचारी कुटुंबासाठी वैद्यकीय उपचाराची मर्यादा रु.२० लाख आहे.श्री.चव्हाण यांचे पुढील उपचारासाठी होणा-या खर्चाबाबत अथवा त्यांना वायसीएमएच येथे शिफ्ट करणेबाबत निर्णय घेणे. | श्री. भारत विठ्ठल चव्हाण, मजुर, जलशुध्दीकरण केंद्र विद्युत यांना पुढील उपचाराकरीता मनपाचे वायसीएम रुग्णालयामध्ये शिफ्ट करावे. |
| ९ | श्री.विलास वाबळे, सहा.सुरक्षा अधिकारी, यांचा मुलगा मतीमंद असून त्याचे वय २५ वर्षापेक्षा जास्त आहे. मुलगा पुर्णपणे त्यांचेवर अवलंबुन असून २५ वर्षानंतरही त्याचेवर उपचार होणेसाठी त्याचा धन्वंतरी योजनेत समावेश करणेबाबत विनंती केली आहे. श्री.वाबळे यांचे अर्जाचा विचार करणे. Permanent disability बाबत ससुन रुग्णालयाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. | मुद्दा क्र. ५ प्रमाणे |
| १० | धन्वंतरी योजनेमध्ये कर्मचारी व कुंटुंबिय यांचेसाठी एकत्रित वार्षीक रक्कम (Capping) ठरविणे. (कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी) | सद्यस्थितीत धोरणामध्ये निश्चित केलेली कुटुंबासाठी वार्षीक मर्यादा र.रु. २०/- लाख योग्य व बरोबर आहे. |
| ११ | शिक्षण मंडळाकडील वर्ग ४ चे शिपाई /रखवालदार कर्मचा-यांना योजनेचे सभासद करुन घेणेस मान्यता देणे. | शिक्षण मंडळ विभागाकडील वर्ग ४ चे पदावर कार्यरत असलेले शिपाई व रखवालदार कर्मचारी हे मनपा आस्थापनेवरील असल्यास त्यांना नियमाप्रमाणे धन्वंतरी योजनेचे सभासद करुन घ्यावे. मनपा आस्थापनेवरील कर्मचारी नसल्यास शिक्षण मंडळ कर्मचाऱ्यांप्रमाणे प्रस्तावीत असलेली कार्यवाही करावी. याबाबत प्रशासन विभागामार्फत खातरजमा करुन घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| १२ | महापालिका हद्दीबाहेर गावाकडे आई/वडीलांचे उपचारासाठी खर्च झालेली व नियमानुसार ११६ तासाचे आत कळविलेली प्रकरणे मंजुर करणेस मान्यता देणे.<br>अ)श्री.सिध्देश्वर सुधाकर वेदपाठक, लिपीक, शिक्षण मंडळ यांनी त्यांचे वडील श्री,सुधाकर यांचे उपचाराचे रु.४६,०००/-चे बिलाची प्रतिपुर्ती करणेबाबत विनंती केली आहे. तथापि त्यांनी दि.१४/११/२०१५ रोजी अश्विनी हॉस्पिटल, अकलुज येथे अँडमिट केलेचे दि.२०/११/२०१५ चे पत्रान्वये कळविले आहे. तथापि अँडमिशन व मनपास कळविणे यामध्ये बराच वेळ झालेचे दिसून येते.<br>ब) श्री.रविंद्र विश्वनाथ निला, वाहनचालक, नगरसचिव यांनी त्यांचे वडील श्री.विश्वनाथ यांचे उपचाराचे रु.२१६८६/- चे बिल मिळणेबाबत विनंती केली आहे. तथापि त्यांनी धोरणानुसार ११६ तास कळविलेचे दिसून येत नाही. | धन्वंतरी धोरणाप्रमाणे सदरची प्रकरणे ११६ तासाचे आत न कळविल्याने अमान्य करण्यात येत आहेत. |
| १३ | महापालिका हद्दीबाहेर उपचार घेऊन सादर केलेली बिले योजनेतील तरतुदीनुसार अदा करणेस मान्यता देणे.<br>अ)- श्री.उत्तम महादू मोटे. रखवालदार, यांनी त्यांचे पत्नीचे डिलीव्हरीचे बिल रु.२२,२०१/-मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री.मोटे यांनी दि.२८/१०/२०१५ रोजी अँडमिट केल्याचे दि.२९/१०/२०१५ रोजी कळविले आहे. सदरची प्रसुती माहेरी करणेचे हेतूने झाली असेल तर याबाबत निर्णय घेणेत यावा.<br>ब) - कै.श्री.उत्तम निवृत्ती लांडगे, लिपीक यांचे मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटल मधील उपचाराचे रु.१२,६०,३२६/- चे बिल सादर केले आहे. श्री.लांडगे यांना संत ज्ञानेश्वर हॉस्पिटल, आदित्य बिर्ला हॉस्पिटल येथील उपचारानंतर मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये सादर केले आहे. | धन्वंतरी पॅनलवरील रुग्णालयामध्ये उपचार न झाल्यास अशा पॅनलवरील रुग्णालयांनी रेफर केलेली प्रकरणे धन्वंतरी धोरणामध्ये निश्चित केलेल्या दरानुसार मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेने मंजुर करावी. परस्पर उपचार घेतलेली प्रकरणे नामंजुर करण्यात येत आहेत. |
| १४ | श्री शहाजी बापु बोत्रे, मजुर, ड क्षेत्रिय विद्युत यांनी मुलाचे उपचारासाठी लिलावती हॉस्पिटल येथे आलेल्या खर्चाचे रु.८,५०,०००/- बिल मिळणेबाबत विनंती केली आहे. श्री.बोत्रे यांनी पॅनलवरील रुग्णालयात उपचार घेतलेबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही. रुग्णास कोणत्याही शिफारशी शिवाय लिलावती रुग्णालयात अँडमिट करुन उपचार घेतले आहेत. तसेच याबाबत महापालिकेस कोणतीही सुचना दिलेली नाही. श्री.बोत्रे यांनी परस्पर मुंबई येथिल लिलावती रुग्णालयात उपचार घेतले आहेत. | धन्वंतरी पॅनलवरील रुग्णालयामध्ये उपचार न झाल्यास अशा पॅनलवरील रुग्णालयांनी रेफर केलेली प्रकरणे व सदरचे आजारावर उपचार धन्वंतरी पॅनलच्या इतर रुग्णालयामध्ये होत असल्याने मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेने मंजुर करावी. परस्पर उपचार घेतलेली प्रकरणे नामंजुर करण्यात येत आहेत. |
| १५ | श्री भूषण शंकर गावडे लिपीक यांची दि.२१/६/२००६ रोजी किडनी प्रत्यारोपण झाले असून श्री.राजू चंदीरामाणी यांची दि.२९/०१/२०१४ रोजी लिव्हर प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाली आहे. दोघांनी नंतरचे ओपीडी स्वरुपातील औषधांचे खर्चाची मागणी केली आहे. याबाबत निर्णय घेणे.<br>(x) Fresh Prescription every time<br>[signature] 21/04/16 | ओ.पी.डी. स्तरावरील तपासणीची व बिल अदा करण्याची सोय सद्यस्थितीत धन्वंतरी योजनेमध्ये नाही तथापि, दुर्धर आजारांसाठी नियमीतपणे गोळ्या औषधे घेणे आवश्यक असतात, अशावेळी अधिकारी व कर्मचारी यांनी सदरची औषधे प्रथमत: मनपाचे वायसीएम रुग्णालयामध्ये उपलब्ध असल्यास तेथुन घ्यावीत. वायसीएम रुग्णालय येथे उपलब्ध नसल्यास सदरची औषधे पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी महासंघ मेडीकल स्टोअर मधुन खरेदी करावीत. व तेथेही औषधे उपलब्ध न झाल्यास बाहेरील मेडीकल स्टोअर मधुन औषधे घ्यावीत. व त्याचे बिल धन्वंतरी कक्षामार्फत अदा करणेत येईल. याकामी धन्वंतरी पॅनलच्या अथवा मनपाचे वायसीएमएच व इतर रुग्णालयांचे रेफर असणे आवश्यक राहील. सदर मुद्यावर यापुर्वीचे दि. २९/९/२०१५ रोजीचे बैठकीमध्ये देखील निर्णय घेण्यात आलेला आहे. |
| १६ | श्री.राजू चंदीरामाणी यांना दि.३१/०१/२०१६ रोजी ज्युपिटर हॉस्पिटल मुंबई येथे अँडमिट केले असल्याचे कळविले आहे. तथापि अर्जासोबत पॅनलवरील रुग्णालयाचे शिफारस पत्र दिसून येत नाही. याबाबत विचार करणे. | धन्वंतरी पॅनलवरील रुग्णालयाने सदर प्रकरणी रेफर केल्याचे दिसुन येत नाही. सबब मागणी अमान्य करण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| १७ | धन्वतरी स्वास्थ्य योजना धोरण-२०१३ मधील कलम ३ (आ) टिपनुसार ज्या महिला कर्मचा-यांनी आई-वडील अवलंबित असलेबाबत फॉर्म भरुन दिला आहे. त्यांचेकडून त्यांना भाऊ/बहीण नाहीत, त्यांचेशिवाय आई/वडीलांना कोणाचाही आधार नाही. तसेच भविष्यात महिला कर्मचा-यास भाऊ असल्याचे निदर्शनास आल्यास कर्मचा-याचे आई/ वडीलांवर झालेला खर्च १८ टक्के व्याजदराने वसुल करुन व कर्मचा-याने महापालिकेची फसवणूक केली म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शास्ती करणेत येईल. अशां स्वरुपाचे रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञापत्र घेऊन नियमानुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत. | धन्वतरी धोरण २०१३ मधील ३ (आ) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे.<br>आ(टिप-महिला कर्मचा-ला तिच्यावर पूर्णपणे अवलंबुन असलेल्या आणि तिच्या बरोबर राहत असलेला तिचा पती, सासु, सासरे किंवा आई, वडिल यांची निवड करता येईल.) व त्याबाबत प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.<br>सदर तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी. |
| १८ | मनपामध्ये कार्यरत असलेल्या प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांना मनपाच्या धन्वंतरी योजने एवजी महाराष्ट्र नागरी सेवा (वैद्यकीय उपचार) नियम १९६१ नुसार अनुज्ञेय असणारी शासनाची योजना लागु करावी. | मनपामध्ये प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले अधिकारी हे जोपर्यंत मनपामध्ये प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत तोपर्यंत त्यांना मनपाची धन्वंतरी स्वास्थ्य योजना लागु राहील व त्यामधील अटी व शर्ती त्यांचेवर बंधन कारक राहतील. या निर्णयाचा धोरणात अंतर्भाव करावा. |
| १९ | माहे सप्टें २०१५ ते जाने २०१६ चे खर्चास मान्यता देण्याबाबत | माहे सप्टें, ऑक्टो, नोव्हें, डिसें २०१५ व जाने २०१६ पर्यंतचा खर्चास मान्यता देण्यात येत आहे. |
| २० | विविध तपासण्यांची बीले अदायगीबाबत.<br>उदा. X- Ray, MRI. CT scan, Sonography etc. | रुग्णांना MRI, CT Scan, Sonography, X- Ray यासारख्या विविध चाचण्या कराव्या लागतात अशा वेळी धन्वंतरी पॅनलच्या रुग्णालयातीलतज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याने Referदिले नंतर मनपाने निश्चित केलेल्या सेंटरमध्येच अशा तपासण्या करणे आवश्यक आहे. व त्यांचीच बिले धन्वंतरी योजनेतील निश्चित केलेल्या दराप्रमाणे देण्यात येतील. |

अनु.क्र.(१८) बाबत बैठकीत वरीलप्रमाणे निर्णय झालेला नाही. राज्यशासनाची प्रतिपूर्ती/धन्वंतरी यापैकी whichever is convenient असे होते.

डॉ.मनोज देशमुख
वैद्यकीय अधिक्षक / आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे प्रतिनिधी

श्री.म... [illegible] ...कर
... तथा सदस्य, धन्वंतरी स्वा.यो.

श्री.महेशकुमार डोईफोडे
सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
तथा सदस्य, धन्वंतरी स्वा.यो.

श्री.सतिश पवार
कायदा सल्लागार
तथा सदस्य, धन्वंतरी स्वा.यो.

श्री.रमेशकुमार जोशी
मुख्यलेखापाल यांचे प्रतिनिधी

श्री.चंद्रकांत इंदलकर
कामगार कल्याण अधिकरी
तथा सचिव, धन्वंतरी स्वा.यो.

श्री.मधुकर रणपिसे
पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ, तथा सह खजिनदार, धन्वंतरी स्वा.यो.

श्री.मनोज माछरे
पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ तथा सह खजिनदार, धन्वंतरी स्वा.यो.

श्री.बबनराव झिंजुर्डे
अध्यक्ष, पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ तथा उपाध्यक्ष धन्वंतरी स्वा.यो.

श्री.राजीव जाधव
आयुक्त तथा
अध्यक्ष धन्वंतरी स्वास्थ्य योजना